# बांबूच्या सायकलवरून ४४०० किलोमीटर प्रवास!

## 'बेटी पढाव'चा प्रचार करण्यासाठी तरुणीची मोहीम; गोदरेज कंपनीचे प्रायोजकत्व



मुंबई : बांबूच्या सायकलवरून प्रवास करणारी प्रिसिलिया मदन आणि सहकारी सुमित.

**श्रद्धा पेडणेकर : सकाळ वृत्तसेवा**

मुंबई, ता. १० : सायकलिंग असो किंवा ट्रेकिंग, कोणतीही मोठी मोहीम आखताना आधी चाचपणी करावी लागते ती प्रायोजकांची. एवढ्या मोठ्या प्रवासासाठी प्रायोजकत्व सगळ्यात महत्त्वाचे असते; मात्र तुमच्या डोक्यात एखादी मोहीम आहे आणि प्रायोजक तुमच्याकडे स्वतःहून चालत आला तर? हे घडले आहे अवघ्या २२ वर्षीय प्रिसिलिया मदन या मुलीसोबत.

पनवेल-कन्याकुमारी हा तब्बल १८०० किलोमीटरचा एकट्याने केलेला सायकल प्रवास, पनवेल-खारदुंग, ओडिसा, मनाली-खारदुंग अशा केलेल्या सायकल मोहिमा प्रिसिलियाने पूर्ण केल्या आहेत. त्यामुळेच कन्याकुमारी-खारदुंग अशी तब्बल ४ हजार ४०० किलोमीटरची मोहीम आखत असलेल्या सायकल मोहिमेसाठी गोदरेज कंपनीने स्वतःहून पुढाकार घेऊन प्रायोजकत्व देऊ केले आहे. त्यासाठी कंपनीने खास बांबूंची सायकलही तिला व तिचा सहकारी सुमित याला दिली आहे. तब्बल ६० दिवसांच्या या प्रवासातील खर्चही कंपनी करणार आहे.

**गोदरेजची किमया**

बांबूंनी बनवलेली इको फ्रेंडली आणि अत्यंत हलकी सायकल गोदरेजने खास या मोहिमेसाठी बनवली आहे. त्याला 'आयएसओ' मार्कही दिला आहे. ती लांबच्या प्रवासासाठीही उत्तम आहे. लवकरच ती कंपनी बाजारात आणणार आहे.

**अशी आहे मोहीम**

प्रिसिलिया मदन आणि सुमित पारिंगे हे कन्याकुमारी ते खारदुंग अशा ६० दिवसांच्या सायकल मोहिमेसाठी निघणार आहेत. ११ जुलैला मुंबईहून ते निघतील. १४ जुलैपासून कन्याकुमारीहून मोहिमेला सुरुवात होईल. 'बेटी पढाओ' या मोहिमेअंतर्गत त्यासाठी ५० लाखांच्या निधीचे लक्ष्य त्यांनी ठरवले आहे. जमलेला निधी 'फ्युएलड्रीम' या कंपनीद्वारे ऑनलाईन गोळा केला जाईल. दिल्लीमधील शाळांतील मुलींच्या शिक्षणासाठी काम करणाऱ्या 'इम्पॅक्ट' या स्वयंसेवी संस्थेला तो दिला जाणार आहे. वर्षभरात १५०० मुलींच्या शिक्षणावर तो खर्च केला जाईल.

**आम्ही मोहिमा अनेकदा आखतो; मात्र त्याच्या प्रायोजकत्वासाठी आम्हाला अनेक कंपन्यांचे उंबरठे झिजवावे लागतात. या वेळी गोदरेज कंपनीने स्वतःहून आमच्या मोहिमेला सहकार्य देण्यासाठी संपर्क साधला. अशा मोहिमांबद्दल कॉर्पोरेट कंपन्यांनी असेच सहकार्य केले तर अनेक विक्रम करता येतील.**

**- प्रिसिलिया मदन**